Press Release

# जीटीडीसीतर्फे गुरुवार, दि. २२ नोव्हेंबर २०१८ रोजी त्रिपुरारी पौर्णिमेच्या निमित्ताने खास सहलीचे आयोजन

**पणजी, २० नोव्हेंबर** – गोवा पर्यटन विकास महामंडळाने गुरुवार २२ नोव्हेंबर २०१८ रोजी त्रिपुरारी पौर्णिमेच्या निमित्ताने विठ्ठलपूर, सांखळी येथे खास सहलीचे (बोट फेस्टिव्हल) आयोजन केले आहे.

गोवा पर्यटन विकास महामंडळ, कला व संस्कृती विभाग, पर्यटन विभाग आणि माहिती व प्रचार विभाग यांच्यातर्फे संयुक्तपणे विठ्ठलपूर, सांखळी येथे त्रिपुरारी पौर्णिमा आयोजित करण्यात आली आहे.

या उत्सवामागे एक रोमहर्षक कहाणी दडलेली असून दिवाळीचा शेवट म्हणून हा उत्सव साजरा केला जातो.

हा उत्सव अनोख्या पद्धतीने साजरा केला जातो. यात उत्सवामध्ये पालन केल्या जाणाऱ्या परंपरेने एका अनोख्या स्पर्धेचे रूप घेतले आहे – ते म्हणजे बोट व जहाजांच्या छोट्या प्रतिकृती बनवणे. बोटींच्या मुख्य स्पर्धेशिवाय यादिवशी इतर विविध सांस्कृतिक कार्यक्रम आणि आतिषबाजी आयोजित केले जातात.

त्रिपुरारी पौर्णिमेची ही खास सहल सर्वव स्थानिक आणि पर्यटकांसाठी खुली आहे. तिकिट दर प्रती व्यक्ती १०० रुपये आहे. सहा वर्षापुढील आणि बारा वर्षाखालील मुलांसाठी तिकीट दर ५० रुपये आहे.

जीटीडीसी कोच सेवा सँटा मोनिका जेट्टी, पणजी येथून रात्री आठ वाजता, तर म्हापसा रेसिडेन्सीपासून रात्री ८.३० वाजता सुटेल आणि विठ्ठलपूर, सांखळी येथे प्रयाण करेल.

Press Release

कार्यक्रमाचे तपशील पुढीलप्रमाणे

संध्याकाळी ७ – भगवान कृष्णाची मिरवणूक
संध्याकाळी ७.३० – वळवंटी नदीत दिवे सोडणे
रात्री ८ – सांस्कृतिक कार्यक्रम
रात्री १०.३० – विठ्ठल रखुमाईची पालखी मिरवणूक
रात्री १०.३० ते मध्यरात्री १२ – पारंपरिक बोटींचा उत्सव
रात्री ११ - त्रिपुरासुर – वध
रात्री ११.०५ – आकाशात ‘सारंग’ फुगा सोडणे
रात्री ११.१५ – फटाक्यांची आतिषबाजी

नोंदणी कृपया संपर्क करा सँटा मोनिका जेट्टी पणजी रेसिडेन्सी – 0832-2223396 किंवा म्हापसा रेसिडेन्सी 0832- 2262694